Date ______
Page ______

# राजयोग साधना

साधना - एखादी विशिष्ट गोष्ट साध्य करण्यासाठी, प्राप्त करण्यासाठी जे प्रयत्न केले जातात त्याला साधना म्हणायचे आणि साधना करण्यासाठी ज्या गोष्टींचा वापर केला जातो ते म्हणजे साधन. अनेक जन्मानंतर प्राप्त झालेल्या नरदेहाचे सार्थक करण्यासाठी - म्हणजेच परमेश्वरप्राप्ती किंवा आत्मज्ञान मिळविण्याचे साध्य साधण्यासाठी जी साधना करावयाची ती म्हणजे राजयोग साधना आणि त्यासाठीचे साधन म्हणजे हरिनाम किंवा भगवद्भक्ति ! भगवंतांनी अर्जुनाच्या रूपाने सर्व मानवजातीला भगवद्गीतेच्या माध्यमातून ह्या साधनेचे मार्गदर्शन केले आहे.

भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायात मुख्यत्वे ही राजविद्या सांगितली आहे. राजयोग म्हणजे कर्मयोग व भक्तियोग यांचे सुंदर मिश्रण. कर्म तर करावयाचे परंतु त्याचे फळ न टाकता देवाला अर्पण करावयाचे. प्रत्येक इंद्रिय ईश्वरार्पण बुद्धीने वापरणे हा राजमार्ग आहे आणि हाच राजयोग. कोणतेही कर्म ते परमेश्वराचे आहे या भावनेने केले तर ते साधे कर्म असले तरी ते पवित्र होते.

अर्जुनाला स्वकियांबद्दल मोह निर्माण झाला व तो स्वधर्म आचरण टाकू लागला तेव्हा त्याचा मोह नाश करण्यासाठी जो उपदेश केला तो म्हणजेच गीता. परंतु त्याला सुरवातीलाच भक्तीचा राजमार्ग नाही सांगितला. प्रथम त्याचा मोह, ममत्व आसक्ती दूर केली ज्यावर जीवन उभारावयाचे ती जीवनाची मुख्य तत्वे सांगितली. त्यात आत्म्याची अमरता, अखंडता व देहाची क्षुद्रता आणि स्वधर्माची अबाध्यता सांगितली. त्यानंतर ज्ञानयज्ञ हा सर्वात श्रेष्ठ आहे असे सांगितले. ज्ञान म्हणजे सर्वत्र ईश्वर आहे व ईश्वराच्या ठिकाणी सर्व सृष्टी सामावलेली आहे हे जाणणे व ते जाणून श्रद्धेने भगवद्भक्ती करून भगवंताला प्रिय असा परमयोगी होणे हा <u>राजयोग</u> आहे.

परमेश्वराला समजून घेण्याचे एक महान साधन म्हणजे भक्ति असे सातव्या अध्यायात सांगितले आहे. यज्ञयाग, ध्यान, तप या सर्वात जिव्हाळा नसेल परमेश्वर समजणार नाही. जिव्हाळा म्हणजे भक्ति. भगवंताचे स्वरूप समजल्यावर जो आनंद होतो, तो शोधून काढण्यासाठी भक्ति हा उत्तम मार्ग आहे. मनुष्य आयुष्यभर पंचेंद्रियांद्वारे अनेक रस चाखण्यात दंग असतो. पण खरा रस चाखावयास

मिळण्याचे भक्ति हे साधन भगवंत दाखवित आहेत. भगवंतांनी भक्तांचे तीन प्रकार सांगितले आहेत. सकाम भक्ति करणारा, निष्काम भक्ति करणारा आणि ज्ञानी भक्त. कोणत्याही प्रकारचा भक्त असो तो भक्तिच्या मंदीरात आला की परमेश्वराला त्याचे कौतुकच वाटते. प्रथम कामनेने आला तरी तो पुढे निष्काम होतो.

ज्याच्या अस्तित्वात सर्व सृष्टी आहे तो परमेश्वर केवळ अनन्य भक्तिनेच प्राप्त होणारा आहे. परमेश्वरावर श्रध्दा ठेवून कायावाचामनाने अहोरात्र प्रयत्न केल्यास अंतकाळाची घडी अतिशय उत्तम होईल व भक्त परमात्मस्वरूप होईल. यासाठी पुन्हा पुन्हा हरिस्मरण, प्रभुस्मरण केले पाहिजे (अ. ८वा)

परमेश्वर हा अव्यक्त असूनही या चराचराला व्यापून आहे. वायु जसा आकाशाच्या आतच सर्वस्वी असतो तरी सृष्टी त्याच्या आतच असते. कल्पारंभी सृष्टीची निर्मिती तोच करतो व कल्पांती तोच ती लयाला नेतो हे त्याचे दिव्य स्वरूप जाणून त्याची अनन्य भक्ति जे करतात. त्यांचा योगक्षेम तोच वहातो. जीवनातील प्रत्येक क्रिया ईश्वराशी जोडून दिल्यास जीवनात अद्‌भूत शक्ति येते. ईश्वरी नामासमोर पाप टिकूच शकत नाही. पान, फूल, फळ काहीही असो, भक्तिने अर्पण केले तर ईश्वराला प्रिय होते (अध्याय-९).

सर्व सृष्टीत नाना रूपांनी - अगदी मुंगीपासून ब्रह्मांडापर्यंत सर्वत्र परमात्मा भरून राहीला आहे. अगदी अणूरेणूमध्येही तोच आहे. सर्वांची काळजी घेणारा, कृपाळू, ज्ञानमूर्ती, वत्सल, समर्थ, पवित्र व सुंदर असा परमात्मा सभोवती उभा आहे. अशा परमेशाला पाहून त्याची भक्ति करावी.

भगवंताच्या मुखातून बाराव्या अध्यायामध्ये भक्तिरसाच्या महिम्याचे तत्व सांगितले आहे. सगुण व निर्गुण भक्ति दोहोंचे ध्येय एकच आहे. सगुण उपासकाला इंद्रिये ही साधनरूप आहेत. कानांनी हरिकथा ऐकणे, जीभेने हरिनाम घेणे, पायांनी तीर्थयात्रा करणे, हातांनी सेवा करणे, डोळ्यांनी हरिरूप पहाणे. अशा तऱ्हेने सर्व इंद्रिये परमेश्वरासाठी वापरणे. निर्गुण भक्तिमध्ये स्वतःच्या अंतःकरणातील परमात्म रूप हाच आधार आहे. सगुण व निर्गुण दोहोंचा अनुभव एकच आहे. लक्ष्मण व भरत दोघेही रामाचे भक्त आहेत. पण दोघांच्या भूमिका

3

निरनिराळ्या आहेत. दोघांच्या कर्मीत हरिभक्तिचा ओलावा होता. सगुण व निर्गुण दोन्हीही भक्त भगवंताला सारखेच प्रिय आहेत. तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात — भगवंताची उपासना, प्रेमभाव, शरणभाव, अनन्य भक्ति ठेवून केली तर भगवंत भक्ताचा उध्दार करतात.

रजोगुण व तमोगुण यांचा निग्रहाने त्याग करावयाचा, तसेच सत्वगुणाचा विकास करुन त्याचीही आसक्ती सोडावयाची. त्यासाठी आत्मज्ञानाची गरज आहे. आणि आत्मज्ञान हे भक्तिशिवाय शक्य नाही. अत्यंत एकाग्रमनाने, निष्काम मनाने भगवंताची सेवा करणे हा सोपा उपाय चौदाव्या अध्यायात सांगितला आहे. प्रयत्नात भक्ति व आत्मज्ञान मिसळले गेले की ही पूर्णता येईल. आत्मज्ञानाशिवाय त्रिगुणांच्या पलिकडे जाता येणार नाही. सत्वगुणांचा अहंकार व फलाची आसक्ती जिंकण्याचा सतत प्रयत्न म्हणजेच भक्तीचे साधन. सेवक, स्वामी व सेवाद्रव्य एकरुप होणे म्हणजे पुरुषोत्तम योग. म्हणजेच खरी भक्ति होय.

ईश्वराकडे प्रेमाने जा, जिज्ञासेने जा, विश्वाच्या कल्याणाच्या तळमळीने जा - कसेही जा - पूर्ण निष्ठेने जा — म्हणजेच अनन्यभक्तिने जा. समर्पणबुध्दीने जा. हा समर्पण योग म्हणजेच राजयोग होय.

भक्तिमार्ग सांगताना भगवंत म्हणतात "मी निर्गुण निराकार। मज कैचा रे आकार।।
मी जाहलो साकार। भक्तालागी"
"नित्य भक्तिधर्म ज्याचे घरी। तो माझा जाण सत्कारी
मी त्याचा जाण कैवारी"

परमेश्वराची भक्ति ही अपूर्व साधना आहे. भक्तामधील ज्ञानी भक्त हा भगवंताला अधिक प्रिय आहे, हे जो जाणतो त्या पुण्यशील लोकांचा मोह व पाप दूर झालेले असते. वृदव्रतो भक्ताची काळजी करतात. तेच दृढव्रती भगवंताची अनन्यभक्ती करतात. जन्ममरणाच्या सापळ्यातून सुटून मुक्त होतात.

भगवंतांनी सातव्या अध्यायापासून १९ व्या, १६ व्या अध्यायापर्यंत पायरी पायरीने भगवंताचे स्वरूप, ईश्वराभिमुख एकाग्रता, समर्पणता व भक्तिरसाचे

महात्म्य सांगितले आहे. असे हे भक्तीचे साधन म्हणजेच राजयोग साधना होय.

~~ ~~ ~~

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

सौ. वर्षा विनायक देव → मो. नं. ७६२०७१२६८०
सिद्धीविनायक रॉयल हेन्स
'रुद्राक्ष' बंगला
महेंद्र एक्झिक्युटीव्हच्या मागे.
वसंतनगर, खेड सातारा

